**विकास योजना - पुणे (मुळ हद्द.)**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१ क क) अन्वये मंजूर विकास योजनेतील १) मौजे लोहगाव स.नं.२३७(भाग) या जमीनीवर वाहनतळ आरक्षण प्रस्तावित करणे २) स.नं.२४८(भाग) व २५३(भाग) मधील क्षेत्रावर ऑफिस कॉम्प्लेक्स व स्टोअरेज यार्ड आरक्षण प्रस्तावित करणे. ३) मौजे धनकवडी स.नं.६ मधील खेळाचे मैदान या आरक्षणाचे नामाभिधान हायस्कूल करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**शासन निर्णय क्रमांक: टिपीएस-१८१८/२०९/प्र.क्र.६९/१५/नवि-१३,**
**दिनांक :२३/०२/२०१८**

**शासन निर्णय :-** सोबतची शासकिय सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव.
२) मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

४) सह सचिव तथा संचालक (नगर रचना), नगर विकास विभाग
५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे

-/ त्यांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी सुचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणीत करावयाचे नकाशे ५ प्रतीत शासनाकडे पाठवावेत. तसेच प्रस्तुत सूचना शासनाच्या दि.१३/०९/२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालील सूचनांप्रमाणे जाहिरात म्हणुन प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| i) जाहीरात देणाऱ्या कार्यालयाचे नांव | :- नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. |
| ii) जाहीरात कोणत्या दिनांकापर्यंत द्यावयाची आहे. | :- तात्काळ |
| iii) प्रसिध्दीचे स्वरुप | :- सर्वाधिक खपाच्या स्थानिक वृत्तपत्रात |
| iv) कोणत्या जिल्ह्यात | :- पुणे |
| v) किती वृत्तपत्रात | :- एका इंग्रजी व एका मराठी वृत्तपत्रात |
| vi) कितीवेळा | :- एकदा |
| vii) जाहीरात खर्चाचे देयक कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठवावयाचे | :- आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे. |

७) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
८) जिल्हाधिकारी, पुणे.
९) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
१०) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.
११) **व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे**

-/ त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास, संचालक, नगर रचना,राज्य, पुणे व सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे, व आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पाठवाव्यात.

१२) **कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

-/ त्यांना विनंती करण्यात येते की, सदर **सूचना** विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१३) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

-/त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची सूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

१४) निवडनस्ती (नवि-१३).

******

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

D:\Pune Desk\Pune Dist\PMC\Lohgaon\Notification.Docx

# सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-३२.**
**दिनांक : २३/०२/२०१८.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम, १९६६**

क्रमांक:-टिपीएस-१८१८/२०९/प्र.क्र.६९/१५/नवि-१३:- ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेची (मुळ हद्द) सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/२०९/प्र.क्र.६९/१५/वि.यो.पुणे-मंजूरी/नवि-१३, दि.०५/०१/२०१७,(यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये १) मौजे लोहगाव स.नं.२३७ (भाग) प्रतिबंधित क्षेत्र व रहिवास विभागात समाविष्ट आहे. २) स.नं. २४८ (भाग) व २५३ (भाग) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये समाविष्ट आहेत. ३) मौजे धनकवडी येथील स.नं.६ (भाग) खेळाचे मैदान असे प्रस्ताव आहेत. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रस्ताव" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी पुणे यांनी मौजे लोहगाव स.नं.२३७(भाग) या जागेवर वाहनतळाचे आरक्षण व स.नं.२४८(भाग) व २५३(भाग) वायूसेना लगतच्या प्रतिबंध क्षेत्रावर ऑफिस कॉम्प्लेक्स व स्टोअरेज यार्ड आरक्षण प्रस्तावित करण्याची विनंती शासनास दि.०४/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. तसेच सरहद्द संस्थेने मौजे धनकवडी येथील स.नं.६ (भाग) मधील खेळाच्या मैदान (एसएम-३८४ द्वारे प्रस्तावित) आरक्षणाचे नामाभिधान हायस्कुल करणे व सदर आरक्षणाचे समूचित प्राधिकरण सरहद्द संस्था असे करणेबाबत विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, विमानतळाकडे येणाऱ्या वाहनांची पार्किंगची समस्या सुटण्यासाठी मौजे लोहगाव स.नं.२३७(भाग) मधील जागेवर वाहनतळ तसेच मौजे लोहगाव स.नं.२४८(भाग) व २५३(भाग) या जागेवर भारतीय वायुसेने करीता ऑफिस कॉम्प्लेक्स व स्टोअरेज यार्ड चे आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे व सरहद्द शिक्षण संस्थेस शैक्षणिक वापराकरीता बांधकाम अनुज्ञेय होण्याकरीता मौजे धनकवडी येथील स.नं.६ (भाग) मधील खेळाच्या मैदानाचे नामाभिधान हायस्कूल करणे व सदर आरक्षणाचे समूचित प्राधिकरण सरहद्द संस्था असे करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१ क क) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारानुसार शासन "उक्त प्रस्तावित फेरबदल" राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीत आम जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करीत आहे. प्रस्तावित फेरबदलासंदर्भात नागरिकांना काही सूचना/हरकती असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग पुणे यांचेकडे लेखी स्वरुपात पाठवाव्यात. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग पुणे यांची प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचनांना सुनावणी देण्याकरिता तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१ क क) अन्वये विहित केलेली कार्यवाही पूर्ण करुन अहवाल शासनास सादर करण्याकरिता "अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे;

टिप :-

अ) प्रस्तुतची सूचना त्यासोबतच्या प्रस्तावित फेरबदल दर्शविणा-या भाग नकाशा सह नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात यावी:-

१) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
२) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

ब) सदरहू सूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा.मं.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**NOTICE**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Developmnt Department**
**Mantralay, Mumbai-400032**
**Dated : 23/02/2018**

**Maharashtra Regional and Town Planning, Act, 1966**

**No.TPS-1818/209/CR-69/15/UD-13:-** Whereas, the Development Plan of Pune Municipal Corporation (Original Limit) (hereinafter referred to as 'the said Development Plan') prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act 1966 (hereinafter referred to as the 'said Act') has been sanctioned by Government in Urban Development Department, vide Notification No.TPS-1815/209/CR-69/15/D.P.Pune/Sanction/UD-13, dated 05/01/2017 (hereinafter referred to as the "said Notification");

And whereas, as per the said development Plan Lohgaon, land bearing 1) S.No.237(Part) is included in Restrictive / Residential zone 2) S.No.248(Part) and 253(Part) included in Restrictive zone and 3) and Dhankawadi S.No.6(Part) is reserved for 'Play Ground' (hereinafter referred to as the 'said Proposals');

And whereas, Collector Pune has requested vide letter dt.04/12/2017 to the Government to propose Parking on S.No.237(Part) Lohgaon and Office Complex & Storage Yard reservation on S.No.248(Part) and 253(Part) Lohgaon and Sarhad Institute requseted to change the designation of reservation Play Ground in Dhankawadi in S.No.6(Part) (proposed by SM-384) as 'High School' and the Appropriate Autority shall be Sarhad Institute;

And whereas, the Government is of the opinion that, to provide Parking facility on S.No.237(Part) Lohgaon for the vehicle coming to Airport, to provide Office Complex & Storage Yard reservation on S.No.248(Part) and 253(Part) Lohgaon for Indian Air Force and to permit educational use for Sarhad Institute, on reservation of Play Ground in S.no.6(Part) of Dhankawadi modification to the said Development Plan is necessary in public interest (hereinafter referred to as the "said Proposed Modification");

Now therefore, in exercise of the power under Section 37 (1AA) of the said Act, the Government finds, it expedient to publish the Notice for the said proposed modification thereby inviting suggestion/ objections from the general public within a period of thirty days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette. Suggestion / Objections shall be forwarded to the Joint Director of Town Planning, Pune, who is being appointed as an Officer to hear suggestions / objections and to complete the modification procedure as mentioned in Section 37 (1AA) of the said Act.

**Note :-** A) The said notice along with part plan showing the said Proposed modification shall be made available for inspection to the general public during office hours on all working days at the following Offices:-

1. Joint Director of Town Planning, Pune Division, Pune.
2. Commissioner, Pune Municipal Corporation, Pune.

B) This notification is also available on Govt. web site www.maharashtra.gov.in (कायदे व नियम).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**(R.M.Pawar)**
**Under Secretary to Government**

D:\Pune Desk\Pune Dist\PMC\Lohgaon\Notification.Docx